**सत्र खटला क्र.७४/२०२१.**
**सरकार वि. भीमराव भोजने अधिक तीन.**
**गुन्हानोंद क्र.२५४/२०२१, तेल्हारा पोलीसठाणे.**
**गुन्हे : भारतीय दंड विधान कलम ३०२, ३०७ सह कलम ३४ अन्वये.**
**सी.एन.आर.क्र.एमएचएके.०५—०००५२६—२०२१.**

---

**(अर्जदार आरोपी क्र.४ दर्शन भीमराव भोजने याचा जामीन अर्ज निशाणी क्र.३२ खालील आदेश.)**
**(दिनांक २९.०८.२०२२.)**

सदरचा आदेश मी या अर्जालगतच पारित करीत असल्यामुळे त्यातील मजकूर पुन्हा नमूद करण्याचे कारण नाही.

२. सदर अर्जास सरकारपक्षातर्फे वादाचे म्हणणे निशाणी क्र.३४ प्रमाणे दाखल करण्यात आले आहे. त्यातील मजकूर खालीलप्रमाणे.

आरोपींविरूद्धचे गुन्हे अतिशय गंभीर स्वरूपाचे आहेत. दोन कुटुंबियांतील पूर्ववैमनस्यावरुन आरोपींनी कुऱ्हाड, लोखंडी पाईप, सब्बल या साधनांनी देविदास भोजने यास जीवानिशी ठार मारले. आरोपी अतिशय निष्ठूर आणि क्रूर आहेत. या आरोपीस जामिनावर सोडल्यास तो पुन्हा साक्षीदारांवर आणि फिर्यादीवर हल्ला करेल. या अर्जदार आरोपीचा गुन्ह्यांत सक्रिय सहभाग आहे. तो साक्षीदारांवर दाबदबाव आणेल. प्रलोभन देईल. खटल्याच्या संपरिक्षेत अडथळे निर्माण करेल. फरार होईल. याच आरोपीचे याच प्रकरणातील आधीचे जामीन अर्ज फेटाळण्यात आले आहेत. त्यामुळे या सर्व कारणांवरुन हा अर्ज फेटाळावा, अशी सरकारपक्षाची विनंती आहे.

**३.** वरीलप्रमाणे अर्ज पाहिला. सरकारपक्षाचे वादाचे म्हणणे निशाणी क्र.३४ पाहिले. प्रथम माहिती अहवाल पाहिला. संपूर्ण प्रकरण पाहिले. उभयपक्षांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

**४.** 'या प्रकरणी या अर्जदार आरोपीविरुद्ध असलेले आरोप अतिशय गंभीर आहेत', हे विद्वान सरकारी वकिलांचे म्हणणे योग्य आहे. तसेच 'गुन्ह्यांना फाशीची किंवा जन्मठेपेची द्रव्यदंडासह शिक्षा आहे', हे देखील सरकारपक्षाचे म्हणणे योग्य आहे. 'याच अर्जदार आरोपीचे आधीचे जामीन अर्ज फेटाळले गेले आहेत', हे देखील सरकारपक्षाचे म्हणणे बरोबर आहे.

५. असे असले तरी, हाही अर्ज फेटाळायलाच हवा, असे नाही. यास अनेक कारणे आहेत.

६. सर्वप्रथम, या प्रकरणातील तपास पूर्ण झाला आहे. दोषारोपपत्र दाखल झाले आहे. आता खटल्याच्या अंतिम न्यायनिर्णयापावेतो, म्हणजे अनिश्चित कालावधीपावेतो, या अर्जदार आरोपीस कारागृहात ठेवण्याने काहीही निष्पन्न होण्याची शक्यता नाही.

७. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, आधीचे जामीन अर्ज फेटाळतांना या अर्जदार आरोपीच्या सापेक्षाने त्याच्या अंधत्वाबद्दल मजकूर फैलावर नव्हता. तो या अर्जासोबत त्याच्या विद्वान वकिलांनी निशाणी क्र.३३ च्या यादीसोबत अनुक्रमांक ४ व ५ प्रमाणे दाखल केला आहे. तसेच, त्याबाबत मूळ/अस्सल कागदपत्रे देखील न्यायालयाच्या अवलोकनार्थ उपस्थित केली आहेत. त्यावरुन हा अर्जदार आरोपी शंभर टक्के आंधळा आहे, असे प्रमाणपत्र त्याच्या लाभात जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांनी दिल्याचे दिसते.

८. एवढेच नव्हे तर, अर्जदार आरोपीची पत्नी देखील ठार आंधळी असल्याचे या अर्जदार आरोपीच्या विद्वान वकिलांचे युक्तिवादात म्हणणे आहे. त्यामुळे या दोघा अंध पतीपत्नीच्या लहान मुलीकडे पाहण्यास अन्य कुणीही नाही, असेही त्यांचे म्हणणे आहे. ते असो.

९. या अर्जदार आरोपीचा गुन्ह्यांतील सहभाग दोषारोपपत्राच्या सोबतच्या कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी निष्पन्न होतो. मात्र, त्याबाबत न्यायालयासमक्ष साक्षीपुरावे होऊन शपथेवर पुरावा येणे अद्याप बाकी आहे. तोपावेतो आरोपी निर्दोष असल्याचे गृहीतक त्याच्या लाभात असल्याचा त्याच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद आहे. आरोपीच्या अंधत्वाबाबतची लेखी/कागदोपत्री प्रमाणपत्रे पाहता, आरोपीचे अंधत्व ही विचारात घेण्याजोगी बाब आहे. अर्थात, अंध व्यक्ती कुठलाही गुन्हा करु शकत नाही, असे अजिबात नाही. मात्र, ते समाधानकारक आणि विश्वासार्ह पुराव्याने सिद्ध व्हावयास हवे. मात्र, तोपावेतो या अर्जदार आरोपीस कारागृहात ठेवण्याने काही साध्य होईल, असे वाटत नाही.

१०. आधीच नमूद केल्याप्रमाणे, दोषारोपपत्र दाखल झाले आहे. मागील जवळपास सव्वावर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून आरोपी कारागृहात आहे. तो याच न्यायालयाच्या न्यायाधिकारकक्षेत राहणारा

आहे. तो अंध असल्याचे आणि त्याची पत्नी देखील अंध असल्याचे किमान प्रमाणपत्रांवरुन तरी प्रथमदर्शनी स्थापित होते.

**११.** वरील सर्व बाबींचा विचार करता, आरोपी फरार होण्याची शक्यता वाटत नाही. तरी देखील त्या संदर्भाने योग्य त्या अटीशर्ती लादून त्याच्या उपस्थितीची तजविज करता येईल, असे वाटते. तीच बाब फिर्यादीच्या आणि इतर साक्षीदारांच्या सुरक्षेच्या सापेक्षाने देखील आहे. त्याबाबत देखील या अर्जदार आरोपीवर अटीशर्ती लादता येतील.

**१२.** वरील संपूर्ण उहापोहाच्या पार्श्वभूमीवर मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सत्र खटला क्र.७४/२०२१ (तेल्हारा पोलीसठाण्याचा गुन्हानोंद क्र. २५४/२०२१) या कामी अर्जदार आरोपी दर्शन भीमराव भोजने यास रु.३०,०००/— (अक्षरी रुपये तीसहजार फक्त) चे व्यक्तिगत बंधपत्र व तेवढ्याच रकमेचे योग्य व लायक जामिनदाराचे बंधपत्र आणि रु.१५,०००/— (अक्षरी रुपये पंधराहजार फक्त) रोखीची सुरक्षा न्यायालयात जमा करण्याच्या अटींवर जामीन मंजूर करण्यात येत आहे.

३. अर्जदार आरोपीने यातील फिर्यादीशी व कुठल्याही साक्षीदारांशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संपर्क करु नये, त्यांच्यावर दाबदबाव आणू नये, अशी त्यास सक्त ताकीद देण्यात येत आहे. या अटीशर्तींचा भंग झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आल्यास हा जामीन आदेश रद्दबातल करण्याबाबत विचार होईल.

(चकोर श्रीकृष्ण बाविस्कर)
विशेष अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
अकोट, जि. अकोला.

दिनांक : २९.०८.२०२२.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Anil D. Bais, Stenographer Grade-I. |
| Court Name | : | District Judge-1 & A.S.J. Akot. |
| Date of Dictation | : | 29.08.2021. |
| Signed by Presiding Officer on | : | 29.08.2021. |
| Uploaded on | : | 29.08.2021. |

…...